ok
१०/७/२४
४:१५

# उल्हासनगर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग

दिनांक : १०/०७/२०२४

# प्रेसनोट

उल्हासनगर महानगरपालिका केंद्र व राज्य पुरुस्कृत समग्र शिक्षा विभाग यांच्या मार्फत (० ते १८) वयोगटातील २१ प्रकारच्या दिव्यांग मुलामुलींचे सर्वेक्षण करण्याबाबत महाराष्ट्र प्राथमिक परिषद मुंबई चर्नीरोड मुख्यकार्यालय यांनी आदेशित केले आहे. सदर दिव्यांग बालकांचे सर्वेक्षण करण्याकरिता मा.आयुक्त तथा प्रशासक डॉ. अझिझ शेख जे समग्र शिक्षा विभागाचे अध्यक्ष आहेत, यांनी दि.०४/०७/२०२४ रोजी झालेल्या बैठकीमध्ये आदेशित केले आहे. सदर सर्वेक्षण दि.१५ जुन ते ३० जुलै पर्यंत करण्याबाबत सुचना देण्यात आल्या आहेत. यामध्ये उल्हासनगर मधील सर्व मनपा शाळा, खाजगी अनुदानित शाळा, विना-अनुदानित शाळा, स्पेशल शाळा, बालवाडी, अंगणवाडी यामध्ये शिकणारे सर्व दिव्यांग बालक यांची माहिती भरणे गरजेचे आहे व तसेच शाळा ते अंगणवाडी व अंगणवाडी ते शाळा या ठिकाणी सर्वेक्षण करण्याबाबत सुचनासुध्दा देण्यात आल्या आहेत. सदर सर्वेक्षणाची सर्वेस्वी जबाबदारी समग्र शिक्षा विभागामध्ये कार्यरत मनपा-समन्वयक, विशेष शिक्षक व विषयतज्ञ यांना देण्यात आली आहे. सदर सर्वेक्षणाबाबत जिल्हा परिषद, ठाणे व डायट कार्यालय राहटोली यांनी समग्र शिक्षा विभाग कार्यालयात नमुना अर्ज उपलब्ध करुन दिलेला आहे व चर्नीरोड कार्यालयामार्फत Google sheet मध्येसुध्दा विशेष गरजा असणा-या बालकांची नोंदणी होणे आवश्यक आहे. यामध्ये उल्हासनगर १ ते ५ परिसरातील सर्व ठिकाणी सर्वेक्षण करुन घरोघरी सर्व दिव्यांग बालकांना शोधून शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे गरजेचे आहे. समावेशित शिक्षणाचे मुख्य उदिष्ट दिव्यांग विद्यार्थ्यांना सामान्य शाळेत प्रवेश व इतर विद्यार्थ्याप्रमाणे समान संधी, समान अधिकार व समान न्याय मिळेल व एकही विद्यार्थी शिक्षणाच्या मुख्य प्रवाहातून वंचित राहणार नाही.

यामध्ये प्रामुख्याने अंध, अंशःत अंध, कर्णबधीर, अस्थिव्यंग, मतिमंद, बहुविकलांग, सेरीब्रल पाल्सी, स्वमग्न व इतर सर्व २१ प्रकारच्या दिव्यांग बालकांचा समावेश आहे. उल्हासनगरमध्ये कार्यरत सर्व स्वयंसेवी संस्था, सामाजिक संस्था, अंगणवाडी सेविका, शाळेतील शिक्षक, मुख्याध्यापक, स्पेशल शाळा, केंद्र प्रमुख, आशा वर्कर, स्थानिक नगरसेवक, दिव्यांगसाठी कार्यकरणारे सर्व युनियन, शासकीय रुग्णालयातील सर्व कर्मचारी व इतर यांनी दिव्यांग सर्वेक्षण करिता समग्र शिक्षा विभागाला सहकार्य करणे जेणेकरुन समावेशित शिक्षण उपक्रमांतर्गत अंगणवाडी, शाळा व महाविद्यालय प्रवेश, अनुकुलित साहित्य साधने, उपकरणे व अध्यापन शैक्षणिक साहित्य, सहाय्यभुत सेवा सुविधा दिव्यांग बालकांना वेळेत देण्यासाठी व नवीन विद्यार्थी शोधण्यास सोयिस्कर होईल.

तरी समग्र शिक्षा विभागामार्फत उल्हासनगर मधील सर्व नागरिकांना विनंती करण्यात येते की, आपल्या परिसरातील दिव्यांग बालक वयोगट (० ते १८) यास शोधण्याकरिता सहकार्य करावे. अधिक माहिती करिता समग्र शिक्षा विभाच्या सौ. संगीता लहाने-काळे यांना मोबाईल क्रमांक ९९६७३८२७०६ वर संपर्क साधणे.

१०/७/२४

(छाया प्रकाश डांगळे)
जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत — माहितीस्तव.
मा. प्रशासक तथा आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका

प्रत — योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.
१) पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२) सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका
- सदरची प्रेस नोट उल्हासनगर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.